International Journal of Engineering Research and Science & Technology

www.ijerst.org

ISSN : 2319-5991

Vol. 22 No. 1(s) (2026)



ijerst.editor@gmail.com

editor@ijerst.com

www.ijerst.com
© 2026 IJERST. All Rights Reserved
Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Research Paper

मराठीतील आदिवासी लोकसाहित्य आणि कृत्रिम बुद्धिमत्ता : जतन , संवर्धन आणि उपयोजन

श्रीम. पोकळे मीना देवराव
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग
जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालय ज्ञानेश्वरनगर, पो. भैंडे, ता. नेवासा , जि. अहिल्यानगर.
मो. नं. : ९४२३७६६३३४
E- Mail : meenakachare34@gmail.com

गोषवारा : भारतासारख्या प्रचंड देशातील लोकसाहित्याचा अभ्यास करणे हे फार मोठे कार्य आहे. आपापल्या प्रांतातील अभ्यासक ते करीत आहेत. अनेकविध बोली, अनेकविध जाती, अनेकविध जमाती आणि या साऱ्यांच्या अनेकविध रीती यातून लोकसाहित्य आले आहे. समाजाची संस्कृती आणि इतिहास हे मानवी चिंतनाचे विषय सातत्याने राहिले आहेत. म्हणून अनादी काळापासून चालत आलेल्या लोकसंस्कृतीचा आणि लोकमानसाचा शोध लोकसाहित्याच्या आधारे घेण्याचे काम जगातील सर्व भाषेबरोबरच मराठी भाषेतही सुरू आहे. आदिवासी लोकसाहित्य हा लोकसाहित्याला समृद्ध करणारा मोठा भाग आहे. आदिवासी लोककला, लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती ही आपल्या सांस्कृतिक वारशाची अमूल्य ठेव आहे. महाराष्ट्रातील आदिवासी समाजाचे लोकसाहित्य हे सांस्कृतिक, धार्मिक आणि सामाजिक जीवनाचे प्रतिबिंब आहे. हे साहित्य प्रामुख्याने मौखिक परंपरेत जतन झालेले असून आधुनिकतेच्या प्रभावामुळे त्याच्या अस्तित्वास धोका निर्माण झाला आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence - AI) या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने या मौखिक परंपरेचे दस्तऐवजीकरण, विश्लेषण आणि संवर्धन करण्याच्या नव्या शक्यता निर्माण झाल्या आहेत. प्रस्तुत संशोधन निबंधात आदिवासी लोकसाहित्याचे स्वरूप, त्यातील वैशिष्ट्ये आणि AI च्या माध्यमातून होणाऱ्या उपयोगांचा अभ्यास केला आहे.

बीजशब्द : आदिवासी लोकसाहित्य, लोकजीवन, लोकसंस्कृती, कृत्रिम बुद्धिमत्ता, नैसर्गिक भाषा प्रक्रिया, मौखिक परंपरा, डिजिटल जतन

प्रस्तावना : आदिवासी लोकसाहित्य–लोककथा, लोकगीते, म्हणी, आख्यायिका–हे मौखिक परंपरेतून पिढ्यान्पिढ्या पुढे आलेले ज्ञानभांडार आहे. या साहित्यामध्ये जीवनाचे तत्त्वज्ञान, नैतिक मूल्ये, निसर्गाबद्दलची कृतज्ञता आणि सामूहिकतेची भावना प्रकर्षाने जाणवते. मात्र बदलत्या काळात आदिवासी लोकसाहित्यापुढे अनेक आव्हाने उभी राहिली आहेत. आधुनिक शिक्षणपद्धती, शहरीकरण, माध्यमांचा प्रभाव, भाषिक ऱ्हास आणि लिखित स्वरूपाचा अभाव यांमुळे हे साहित्य लुप्त होण्याच्या मार्गावर आहे. तरुण पिढी आपल्या पारंपरिक भाषांपासून आणि कथनपरंपरेपासून दूर जात असल्याने लोकसाहित्याच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह निर्माण

झाले आहे. त्याचबरोबर या लोकसाहित्यासाठी नव्या संधीही उपलब्ध होत आहेत. संशोधन, लिप्यंतरण, अनुवाद, डिजिटल माध्यमे, लोकसाहित्य संकलन प्रकल्प आणि शैक्षणिक अभ्यासक्रमांमुळे आदिवासी लोकसाहित्याचे जतन व संवर्धन शक्य होत आहे. या संधींचा योग्य वापर केल्यास आदिवासी लोकसाहित्याला जागतिक स्तरावर ओळख मिळू शकते. म्हणूनच आदिवासी लोकसाहित्य समोरील आव्हाने ओळखून त्यावर उपाय शोधणे आणि उपलब्ध संधींचा सकारात्मक उपयोग करणे ही आजच्या काळाची गरज आहे. लोकसाहित्य हे कोणत्याही समाजाच्या सांस्कृतिक स्मृतीचे जिवंत रूप असते. महाराष्ट्रातील आदिवासी समाज–उदा. वारली, भील, गोंड, कोकणा–यांचे लोकसाहित्य निसर्गाशी एकरूप झालेले आहे. कथा, गीते, समारंभ, नृत्य आणि प्रतीकात्मक चित्रकला यांच्या माध्यमातून त्यांची जीवनदृष्टी व्यक्त होते. मात्र औद्योगिकीकरण, स्थलांतर आणि भाषिक बदल यांमुळे या परंपरांचे जतन करणे आव्हानात्मक ठरत आहे. या पार्श्वभूमीवर कृत्रिम बुद्धिमत्ता हे एक प्रभावी साधन म्हणून उदयास आले आहे.

आदिवासी लोकसाहित्याचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये :

आदिवासी लोकसाहित्य म्हणजे त्यांची मौखिक गंगोत्री होय. हे वाङ्मय चिरंतन अशा उदात्त जीवन व सांस्कृतिक मूल्यांनी सजविलेले एक खुले भांडार म्हणता येईल. गतकाळातील लोकसंस्कृती आणि लोकजीवन पद्धती यांचे दर्शन आपणास लोकवाङ्मयातून घडते. आदिवासी लोकसाहित्य हे निसर्गनिष्ठ, मौखिक, सामुहिक, साधे असून सांस्कृतिक वारशाने समृद्ध आहे. त्यातून आदिम जीवनदृष्टी, परंपरा, संघर्ष, उत्सव आणि श्रद्धा यांचे जिवंत दर्शन घडते. आदिवासी समाजाची परंपरा, संस्कृती, रुढी - परंपरा आणि जीवनदृष्टी लोकसाहित्याच्या माध्यमातून आपल्या अनोख्या रूपात प्रकट होते. आदिवासी लोकसाहित्य प्रामुख्याने मौखिक परंपरेने चालत आलेले असते. हे मुख्यतः बोलण्यावर आधारित आहे. पिढ्यान्-पिढ्या कथा, गाणी, म्हणी, दंतकथा तोंडी परंपरेतून जपल्या जातात. लेखनपरंपरेपेक्षा स्मरणशक्ती आणि समुहापुढील सादरीकरण याला जास्त महत्त्व असते. शहरी किंवा शास्त्रीय भाषेत मांडलेले असले तरी ते खूप समृद्ध आहे. आदिवासी जीवन निसर्गाशी घट्ट गुंफलेले असल्यामुळे त्यांच्या साहित्याचा केंद्रबिंदू निसर्ग, जंगल, पशू - पक्षी, ऋतू, जमीन इत्यादी असतात. उदा. पावसाविषयी गीते, शेती व शेतीशी संबंधित कथा, जंगलदेवतेचे वर्णन इ. आदिवासी जमातीतील स्वतःचे देव-देवता, कुलदैवत आणि सृष्टी-निर्मितीच्या कथा साहित्यात्यातून अवतरतात. उदा. बिरसा मुंडा, पिठोराई माता, वाघदेव, हिरवा देव, भुमका अशा देवतांच्या कथा. सण, उत्सव, शेती, विवाह, जन्म, मृत्यू अशा प्रसंगांना अनुसरून गीते रचली जातात. ढोल, ताशा, नगारा, तुंबी यांसारख्या वाद्यांसह नृत्याचा समावेश असतो. उदा. गोंडांचा दांडारी
नृत्य, भिल्लांचे गावता गीत. आदिवासी साहित्य सामूहिक असते. एकजूट, आपुलकी आणि सहजीवन या मूल्यांना प्राधान्य. गीते आणि कथा एका व्यक्तीच्या नव्हे तर संपूर्ण समाजाच्या भावना व्यक्त करतात. भाषा सहज, सोपी आणि प्रत्यक्ष अनुभवांवर आधारित असते. निसर्गातील घटकांचे प्रतिकात्मक वापर : जसे वाघ म्हणजे शक्ती, नदी म्हणजे जीवन, झाड म्हणजे संरक्षण. आदिवासी समाजातील परंपरा, रूढी, नातेसंबंध, विवाहपद्धती, सण-उत्सव,

टोळीव्यवस्था इत्यादींचे अचूक प्रतिबिंब त्यांच्या लोकसाहित्यात दिसते. आदिवासी लोकसाहित्यात चमत्कारिक घटना, अद्‌भुत पात्रे, आत्मा-देवता, जादूटोणा यांचे वर्णन आढळते. भिल्ल, गोंड, कोळी, संथाल इत्यादी जमातींमध्ये वीरांच्या कथा, लढाया आणि रक्षणकर्त्यांच्या दंतकथा प्रसिद्ध आहेत. दैनंदिन श्रम, जंगलातील आव्हाने, सण-उत्सवतील आनंद हे सर्व लोकसाहित्यातून जिवंतपणे दिसते.

परंपरागत आणि आधुनिक लोकसाहित्य : पूर्वीचे लोकसाहित्य पूर्णपणे मौखिक होते. कथा, गीते, म्हणी, उखाणे पिढ्यान्‌पिढ्या तोंडी सांगितले जात. या साहित्याचे निसर्गाशी घट्ट नाते असल्याचे दिसते. जंगल, डोंगर, नद्या, प्राणी, ऋतू आणि शेती यांभोवती कथा व गीते विणलेली असत. सामूहिक जीवनाचे प्रतिबिंब दिसते. समूह, जमात, कुटुंब, सण-उत्सव, विवाह, मृत्यूसंस्कार यांचे चित्रण ठळक होते. श्रद्धा व मिथकांचा प्रभाव आहे. देवता, आत्मा, भुतेखेते, अंधश्रद्धा यांचा कथांमध्ये मोठा वाटा होता. धार्मिक व सामाजिक जीवनाशी निगडित सण, उत्सव, पूजा, विवाह, शेती, शिकार यांच्याशी कला जोडलेली होती. माती, शेण, दगड, पाने, फुले, झाडांची साल, रंग अशी नैसर्गिक साधने वापरले जात. कलेसाठी वेगळे व्यासपीठ नव्हते. भिंती, झोपड्या, मडकी, शरीरावरची चित्रे हाच कलेचा कॅनव्हास. कलाकार वेगळा नसून संपूर्ण समाजच कलाकार होता. परंपरेतून पिढ्यान्- पिढ्यांत शिक्षणाचे हस्तांतरण होत असे. कोणतेही औपचारिक शिक्षण नाही, निरीक्षण व सहभागातून शिकणे. उदा. वारली चित्रकला, भील चित्रकला, गोंड कला, पिथोरा चित्रे, टोडा भरतकाम इ.

आज लोकसाहित्य लिखित, ध्वनिमुद्रित आणि डिजिटल माध्यमांत साठवले जात आहे. आधुनिक जीवनाचे प्रतिबिंब त्यात दिसते. शिक्षण, स्थलांतर, शोषण, विस्थापन, जंगल हक्क, राजकारण, संघर्ष यांचे प्रतिबिंब दिसते. वैयक्तिक अनुभवांची मांडणी, सामूहिकतेबरोबरच व्यक्तीगत वेदना, प्रश्न आणि आत्मकथन त्यातून पुढे येत आहे. परिवर्तनशील भाषा व शैली, मूळ बोलींबरोबरच प्रादेशिक भाषा आणि आधुनिक शैलीचा वापर त्याचबरोबर जागरूकता व आत्मभान वाढले आहे. आदिवासी अस्मिता, हक्क, स्वाभिमान आणि सांस्कृतिक जतनाची जाणीव तीव्र झाली आहे. आज आदिवासी लोककला, परंपरा आधुनिकतेच्या वळणावर उभी आहे. सकारात्मक बदल घडून येत आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख निर्माण होत आहे. प्रदर्शन, संग्रहालये, कला-दालनांत आदिवासी कलेला स्थान स्थान मिळू लागले आहे. अनेक कलाकारांसाठी कला हा उत्पन्नाचा स्रोत झाला आहे. शासकीय व स्वयंसेवी उपक्रम राबवले जात आहेत. वारली जमातीच्या पारंपरिक कथा लिपिबद्ध होत आहेत. विविध जमातींच्या मौखिक कथांचे संकलन होत आहे. भिल्ल, गोंड, कोकणी, कोलाम जमातींच्या कथांचे पुस्तक रूपांतरे होत आहेत. ढोलगीत, विवाहगीते, शिकारगीते यांचे पुस्तकांत संकलन केले जात आहे. आदिवासी कवींचे कवितासंग्रह अनुवादासह उपलब्ध होत आहेत. लोकसाहित्यावर आधारित संशोधन ग्रंथ व प्रबंध विद्यापीठांत सादर होत आहेत.

कृत्रिम बुद्धिमत्तेची संकल्पना : आजच्या आधुनिक युगात कृत्रिम बुद्धिमत्तेला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे संगणक प्रणालींना मानवी बुद्धिमत्तेसारखी विचार

करण्याची, शिकण्याची व निर्णय घेण्याची क्षमता देणारे तंत्रज्ञान. यामध्ये मशीन लर्निंग, नैसर्गिक भाषा प्रक्रिया (NLP), आवाज ओळख प्रणाली, प्रतिमा ओळख तंत्रज्ञान इ. तंत्रांचा समावेश होतो. कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे संगणकीय प्रणालींना शिकण्याची, विश्लेषण करण्याची व निर्णय घेण्याची क्षमता देणारे तंत्रज्ञान. मशीन लर्निंग, डीप लर्निंग, नैसर्गिक भाषा प्रक्रिया, भाषण ओळख प्रणाली, प्रतिमा विश्लेषण हे त्यातील उपघटक आहेत.

आदिवासी लोकसाहित्य आणि AI यांचा संबंध : आजच्या डिजिटल युगात मराठीतील आदिवासी लोकसाहित्य आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) यांचा परस्पर संबंध अत्यंत महत्त्वाचा विषय ठरत आहे.

अ. भाषा संवर्धन : आदिवासी बोलीभाषा लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. NLP तंत्रज्ञानाद्वारे शब्दसंग्रह तयार करणे भाषांतर साधने विकसित करणे शैक्षणिक ॲप्स तयार करणे यामुळे भाषेचे संवर्धन शक्य होते.

ब. जतन आणि दस्तऐवजीकरण : अनेक आदिवासी कथा व गीते मौखिक परंपरेत आहेत. AI च्या साहाय्याने ध्वनिमुद्रणांचे टेक्स्टमध्ये रूपांतर, भाषांतर, डिजिटल संग्रह तयार करणे यामुळे हे साहित्य पुढील पिढ्यांसाठी जतन करता येते.

क. संशोधन आणि विश्लेषण : AI मोठ्या प्रमाणातील लोककथांचा अभ्यास करून समान कथानक रचना शोधू शकते, सांस्कृतिक प्रतीकांचे विश्लेषण करू शकते, वेगवेगळ्या जमातींतील कथांची तुलना करू शकते.

ड. सर्जनशील वापर : AI च्या मदतीने, लोककथांवर आधारित ॲनिमेशन, डिजिटल पुस्तके, शैक्षणिक खेळ तयार करता येतात, ज्यामुळे नव्या पिढीला परंपरेशी जोडता येते.

आदिवासी लोकसाहित्य आणि कृत्रिम बुद्धिमत्ता : जतन, संवर्धन आणि नव्या शक्यता -

मराठीतील आदिवासी लोकसाहित्य आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) यांचा परस्पर संबंध हा आजच्या डिजिटल युगात अत्यंत महत्त्वाचा विषय ठरत आहे. परंपरा आणि तंत्रज्ञान यांच्या संगमातून आदिवासी लोकसाहित्याचे जतन आणि संवर्धन होणे गरजेचे आहे.

१. AI च्या माध्यमातून आदिवासी लोकसाहित्याचे जतन :

भाषांतर आणि बहुभाषिक जतन : आदिवासी बोलीभाषांतील साहित्य मराठी व इतर भाषांत रूपांतरित करता येते.

ध्वनी ते लेखन : आदिवासी लोकसाहित्यातील मौखिक कथा ध्वनिमुद्रित करून त्यांचे स्वयंचलित लिप्यंतर करता येते.

प्रतिमा विश्लेषण : वारली किंवा गोंड चित्रकलेतील नमुन्यांचे AI च्या साहाय्याने विश्लेषण.

डिजिटल संग्रह : कथा, गीते आणि चित्रे यांचे डेटाबेस तयार करून ऑनलाइन संग्रहालय उभारता येते.

२. जतन व संवर्धनाची गरज :

सांस्कृतिक ओळख टिकवण्यासाठी : आदिवासी समाजाची स्वतःची स्वतंत्र ओळख, भाषा आणि परंपरा आहेत. त्यांचे अस्तित्व टिकवण्यासाठी सांस्कृतिक उपक्रमांचे संरक्षण आवश्यक आहे.

परंपरागत ज्ञान जिवंत ठेवण्यासाठी : जंगल व्यवस्थापन, औषधी वनस्पतींचे ज्ञान, हस्तकला इत्यादी पारंपरिक ज्ञान भविष्यातील पिढ्यांना उपयुक्त ठरते.
विविधतेचे संरक्षण : भारताच्या सांस्कृतिक विविधतेत आदिवासी परंपरांचा अनमोल वाटा आहे.

पुरातन कला स्वरूपांचे संवर्धन : आदिवासी नृत्य, वाद्ये, काव्य, लोककथा, चित्रकला (उदा. वारली, भील कला) या लयाला जाऊ नये यासाठी जतन आवश्यक आहे.

३. जतन व संवर्धनासाठी आवश्यक उपाय

सरकारी आणि संस्थात्मक प्रयत्न : आदिवासी संशोधन केंद्रे स्थापन करणे. सांस्कृतिक संग्रहालये व कलादालनांमध्ये आदिवासी कला व इतिहास प्रदर्शित करणे. आदिवासी कला व संस्कृती संवर्धन योजना, अनुदान, शिष्यवृत्ती यांसारखे उपक्रम राबवणे.
शिक्षण व दस्तावेजीकरण : आदिवासी भाषांचे दस्तावेजीकरण, शब्दकोश, व्याकरणे तयार करणे. लोककथा, लोकगीते, नृत्य, विधींचे व्हिडिओ/ऑडिओ दस्तावेजीकरण करून संग्रहित करणे. शाळा व महाविद्यालयांमध्ये आदिवासी लोकसंस्कृतीविषयक अभ्यासक्रम समाविष्ट करणे.
आर्थिक सक्षमीकरण : हस्तकला व लोककलेच्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध करून देणे. आदिवासी कलाकारांना प्रशिक्षण व आर्थिक मदत. पर्यटन क्षेत्रात आदिवासी कला व संस्कृतीचा समावेश करून सांस्कृतिक पर्यटनाचा विकास.
समाजाचा सहभाग : आदिवासी समुदायांना त्यांच्या परंपरांच्या जतनासाठी स्वतः नेतृत्व देणे. प्रदेशनिहाय सांस्कृतिक महोत्सव, मेळावे, नृत्य-गीत स्पर्धा आयोजित करणे. लोकांमध्ये आदिवासी संस्कृतीबद्दल जागरूकता वाढवणे.
माध्यमे व तंत्रज्ञानाचा उपयोग : डॉक्यूमेंटरी, चित्रपट, वेब सिरीजद्वारे आदिवासी लोकजीवनाचे चित्रण. सोशल मीडियावर आदिवासी कला व संस्कृती प्रसारित करणे. डिजिटल आर्काइव्ह, ई-लायब्ररी विकसित करणे.
संशोधनातील संभाव्य उपयोग : आदिवासी लोकसाहित्यातील कथानक रचनेचे संगणकीय विश्लेषण करणे शक्य होईल, प्रतिमा आणि प्रतीकांचे सांस्कृतिक अर्थ शोधणे सोपे होईल. विविध जमातींतील कथांची तुलनात्मक मांडणी करता येईल. लुप्त होत चाललेल्या बोलीभाषांचा शब्दसंग्रह तयार करणे शक्य होईल.
नैतिक आणि सामाजिक आव्हाने : आज आदिवासी लोकसाहित्यासमोर अनेक आव्हाने आहेत. सांस्कृतिक संवेदनशीलता जपणे, मूळ समुदायाची परवानगी घेणे, माहितीचा गैरवापर टाळणे, भाषिक अचूकता राखणे, AI वापरताना स्थानिक समुदायांचा सहभाग अत्यावश्यक आहे. बौद्धिक संपदा हक्क, समुदायाची संमती, सांस्कृतिक अपप्रयोग टाळणे, डेटाच्या मालकी हक्काचा प्रश्न, AI वापरताना आदिवासी समुदायांचा सहभाग अनिवार्य आहे. हि सर्व आव्हाने स्वीकारून आदिवासी लोकसाहित्याचे जतन आणि संवर्धन आणि अस्तित्व राखणे गरजेचे आहे.
निष्कर्ष : पूर्वीचे आदिवासी लोकसाहित्य हे जगण्याची पद्धत होते, तर आजचे लोकसाहित्य जगण्याच्या संघर्षाची जाणीव करून देते. दोन्हीही परंपरेचे वेगवेगळे पण तितकेच महत्त्वाचे टप्पे आहेत. आजच्या आदिवासी संस्कृतीसमोरील आव्हाने समजून घेण्यासाठी, सामाजिक, आर्थिक,

सांस्कृतिक आणि पर्यावरणीय दृष्टिकोनातून विश्लेषण करणे आवश्यक आहे. मौखिक परंपरेतील आदिवासी लोकसाहित्य आज पुस्तक, ध्वनी आणि डिजिटल माध्यमांमुळे जतन, प्रसार आणि अभ्यासयोग्य बनत आहे. आदिवासी संस्कृती आज सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि पर्यावरणीय दबावाखाली आहे. योग्य धोरणे आणि सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि पर्यावरणीय उपाययोजना केल्यास संस्कृती जपता येईल आणि जीवनमान सुधारता येईल. आदिवासी संस्कृती आज आव्हाने आणि संधींच्या संगमावर आहे. मराठीतील आदिवासी लोकसाहित्य हे अमूल्य सांस्कृतिक वारसा आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाच्या साहाय्याने त्याचे जतन, संशोधन आणि जागतिक स्तरावर प्रसार शक्य आहे. मात्र तांत्रिक प्रगतीसोबत सांस्कृतिक संवेदनशीलता आणि नैतिक जबाबदारी जपणे अत्यावश्यक आहे. भविष्यात AI आणि लोकसाहित्य यांचा समन्वय सांस्कृतिक पुनरुज्जीवनाला नवी दिशा देऊ शकतो. मराठीतील आदिवासी लोकसाहित्य हे आपल्या सांस्कृतिक वारशाचे अमूल्य भांडार आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने हे साहित्य जतन, अभ्यास आणि प्रसारित करता येईल. मात्र, तंत्रज्ञानाचा वापर करताना आदिवासी समुदायांचा सन्मान आणि हक्क जपणे तितकेच महत्त्वाचे आहे.

संदर्भसूची :

१. भागवत दुर्गा, लोकसाहित्याची रूपरेखा, वरदा प्रकाशन, दुसरी आवृत्ती, २०१५ २. प्रा. डॉ. देशमुख शिवाजी, आदिवासी ठाकरांचे लोकजीवन, रेवा प्रकाशन, गणेशनगर, पंढरपूर, प्रथमावृत्ती जानेवारी २००९ ३. संपा. स्टॅमाटिओस पापाडाकिस आणि अलेक्झांड्रोस कपानायरिस, लोकपरंपरा आणि त्याचे डिजिटल मानविकी संदर्भातील विश्लेषण, इन्फोर्मेशन सायन्स रेफरन्स,२०२२

४. संपा. डॉ. गंधारे द. के., प्रा. डॉ. रोंगटे तुकाराम, प्रा. डॉ. मिसाळ निवृत्ती, लोकसाहित्य कला आणि संस्कृती, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्रथमावृत्ती मे २०१३

५. डॉ. चवरे रा. गो, आंध जमात लोकसाहित्य आणि संस्कृती, शब्द वैभव प्रकाशन, पुणे,

६. पथक यशवंत, वारली लोकसंस्कृती, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, १९८९